# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागात विविध औद्योगिक वसाहतींमध्ये अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या धोरणानुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विहित अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहित नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| पदाचा सांकेतिक कोड | पदाचे नांव | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विभागिय अग्निशमन अधिकारी | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| २. | अग्निशमन केंद्र अधिकारी | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | १ | १ | ३ | **१५** |
| ३. | सहाय्यक अग्निशमन अधिकारी | ०१ | ०२ | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | -- | **०७** |
| ४. | ऑटोमोबाईल इंजिनिअर | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| ५. | उप अग्निशमन अधिकारी | - | ०१ | - | - | - | ०१ | ०१ | - | - | **०३** |
| ६. | कनिष्ठ संचार अधिकारी | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| ७. | ऑटो इलेक्ट्रीशियन | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | **०१** |
| ८. | चालक यंत्र चालक | ०९ | ०८ | ०३ | ०२ | ०४ | ०२ | ०२ | ०१ | १९ | **५०** |
| ९. | अग्निशमन विमोचक | | १८ | | | | | | | | **१८** |
| १०. | मदतनीस (अग्निशमन) | ३ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | | **१६** |
| | | | | | | | | | | **एकूण** | **११३** |

- वरील पदनिहाय स्थिती ही जाहिरात प्रसिध्दीसाठी निर्गमित केलेल्या तारखेपर्यंतची आहे. सदर प्रवर्गनिहाय पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.
- सदर भरती प्रक्रिया फक्त पुरुष उमेदवारांसाठी लागू राहील.
- मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन निर्णयानुसार ०५ वर्ष शिथिलक्षम राहील.
- उपरोक्त नमूद सर्व पदांसाठी आवश्यक ती अर्हता धारण करणा-या प्रकल्पग्रस्त, गृहसंरक्षक दल, माजी सैनिक व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत पदक प्राप्त उमेदवारास शासकिय नियमाप्रमाणे नियुक्तीबाबत आरक्षण देण्यात येईल.
- दि.२०/०८/२०१० पर्यंत प्राप्त झालेलेच अर्ज स्विकाले जातील.
- सविस्तर माहिती व अर्हता म.औ.वि.महामंडळाच्या संकेत स्थळावर **www.midcindia.org** प्रसिध्द करण्यात आली आहे.

**म.औ.वि.महामंडळ अग्निशमन विभाग**

०१) **विभागिय अग्निशमन अधिकारी - (वेतनश्रेणी :- रुपये १५,६००-३९१०० व ग्रेडपे- रुपये ५,४००)**- वय ०१/०१/२०१० रोजी ४५ वर्षापेक्षा अधिक असू नये.

**शैक्षणिक पात्रता :-** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.(२) बॅचलर ऑफ फायर इंजिनिअरींग (बी.ई.-फायर) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय,नागपूर यांची पदवी उत्तीर्ण असावा. **अथवा** मेंबरशिप एक्झामिनेशन (एम.आय.)-फायर इंजिनिअर्स (यू.के.) या संस्थेकडून पदवी प्राप्त केलेली असावी. **अथवा** बी.ई. सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मॅकेनिकल, ऑटोमोबाईल, केमिकल,कॉम्प्युटर यापैकी एक पदवी उत्तीर्ण असावा. **अनुभव-** (१) उमेदवाराला अग्निशमन विभागाचा मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा सह मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर काम केल्याचा अनुभव असावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली ५०० अग्निशमन कर्मचा-यांनी कार्य केलेले असावे. आस्थापनाचे कार्य केलेले असावे. (२) किमान १० अग्निशमन केंद्रे व ५० अग्नि वाहने ज्यामध्ये रुग्णवाहिका, रेस्क्यू वाहन, विशेष कार्यहेतू वाहन व हायड्रोलिक प्लॅटफॉर्म इत्यादीचा समावेश असणा-या अग्निशमन सेवेत कामाचा अनुभव आवश्यक. (३) म.औ.वि.म.अग्निशमन सेवेतील अग्निशामक विमोचक, चालक याश्रेणीत काम करणारा कर्मचारीवर्ग अधिक असल्यामुळे या कर्मचा-यांना सुस्पष्ट मराठी भाषेत सूचना/आदेश देणे अपेक्षित असून त्यासाठी उमेदवारास सुस्पष्ट मराठी व सुस्पष्ट इंग्रजी भाषा येणे अत्यावश्यक आहे.

२) **अग्निशमन केंद्र अधिकारी :- (वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० व ग्रेडपे- रुपये ४,४००)**- उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी ४० वर्षापेक्षा अधिक असू नये.

१) **शैक्षणिक पात्रता** - बी.एस्सी.भौतिक शास्त्र किंवा रसायन शास्त्र विषय घेवून ५० टक्के मार्कानी पास असावा. **अथवा** बी.एस्सी. आयटी ५० टक्के मार्क. **अथवा** उमेदवाराने बी.ई. सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, कॉम्पुटर, केमिकल इत्यादी पैकी कोणतीही एक परिक्षा पास असावा. **अथवा** उमेदवाराने डिप्लोमा इन सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, कॉम्पुटर, केमिकल इत्यादी पैकी कोणतीही एक परिक्षा पास असावा.

**व्यावसायिक पात्रता** :- १) उमेदवारांची नियुक्ती जरी शैक्षणिक अर्हतेवर झाली असेल तरी सुध्दा **इजिनिअरींग पदवी** प्राप्त उमेदवारांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर अथवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र राज्य यांचा डिप्लोमा आणि ॲडव्हॉन्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरींग हा पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्णकरणे बंधनकारक राहील. २) उमेदवारांची नियुक्ती जरी शैक्षणिक अर्हतेवर झाली असेल तरी सुध्दा इजिनिअरींग **पदवीका व इतर पदवी** प्राप्त उमेदवारांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर अथवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र राज्य यांचा सब ऑफिसर्स डिप्लोमा आणि ॲडव्हॉन्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरींग हे सर्व पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्णकरणे बंधनकारक राहील. याशिवाय या उमेदवारांना आयएफई(युके)ची पदवी अथवा एम.आय.-फायर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असून अशी अर्हता प्राप्त न करणारे उमेदवारांची निवड अथवा पदोन्नती रद्दबातल होईल.

**३) सहाय्यक अग्निशमन अधिकारी :- (वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० व ग्रेडपे- रुपये ४,३००)-** उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी ४० वर्षापेक्षा अधिक असू नये.

२) **शैक्षणिक पात्रता** - बी.एस्सी.भौतिक शास्त्र किंवा रसायन शास्त्र विषय घेवून ५० टक्के मार्कांनी पास असावा. **अथवा** बी.एस्सी. आयटी ५० टक्के मार्क. **अथवा** उमेदवाराने बी.ई. सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, कॉम्पुटर, केमिकल इत्यादी पैकी कोणतीही एक परिक्षा पास असावा. **अथवा** उमेदवाराने डिप्लोमा इन सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, कॉम्पुटर, केमिकल इत्यादी पैकी कोणतीही एक परिक्षा पास असावा.

**व्यावसायिक पात्रता** :- १) उमेदवारांची नियुक्ती जरी शैक्षणिक अर्हतेवर झाली असेल तरी सुध्दा **इजिनिअरींग पदवी** प्राप्त उमेदवारांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर अथवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र राज्य यांचा डिप्लोमा आणि ॲडव्हॉन्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरींग हा पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्णकरणे बंधनकारक राहील. २) उमेदवारांची नियुक्ती जरी शैक्षणिक अर्हतेवर झाली असेल तरी सुध्दा इजिनिअरींग **पदवीका व इतर पदवी** प्राप्त उमेदवारांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर अथवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र राज्य यांचा सब ऑफिसर्स, डिप्लोमा आणि ॲडव्हॉन्स डिप्लोमा इन फायर इंजिनिअरींग हे सर्व पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्णकरणे बंधनकारक राहील. याशिवाय या उमेदवारांना आयएफई(युके)ची पदवी अथवा एम.आय.-फायर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असून अशी अर्हता प्राप्त न करणारे उमेदवारांची निवड अथवा पदोन्नती रद्दबातल होईल.

**०४) ऑटोमोबाईल इंजिनिअर :- (वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० व ग्रेडपे- रुपये ४,३००)-** उमेदवाराचे दिनांक ०१/०१/२०१० रोजी वय ३० वर्षापेक्षा अधिक असू नये.

**शैक्षणिक पात्रता** :- ऑटोमोबाईल इंजिनिअरचा पदविका महाराष्ट्र शासनाच्या टेक्निकल एज्यूकेशन बोर्डाचा कोर्स उत्तीर्ण. तथापी ऑटो मोबाईल पदवी धारकास प्राधान्य देण्यात येईल. **अनुभव** :- एअरपोर्ट,संरक्षणदल, पोलिस किंवा अग्निशमन विभागाच्या कार्यशाळेत किंवा एखाद्या नामांकित कंपनीच्या कार्यशाळेत काम केल्याचा ३ वर्षाचा अनुभव

**५) उप अग्निशमन अधिकारी :- (वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० व ग्रेडपे- रुपये ४,२००)-** उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी ३० वर्षापेक्षा अधिक असू नये.

१. **शैक्षणिक पात्रता** :- बी.एस्सी.भौतिक शास्त्र किंवा रसायन शास्त्र विषय घेवून ५० टक्के मार्कांनी पास असावा. **अथवा (२)** बी.एस्सी. आयटी ५० टक्के मार्क. **अथवा (३)** उमेदवाराने डिप्लोमा इन सिव्हील, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, कॉम्पुटर, केमिकल इत्यादी पैकी कोणतीही एक परिक्षा पास असावा.

**व्यावसायिक शैक्षणिक पात्रता**

१) उमेदवारांची नियुक्ती जरी शैक्षणिक अर्हतेवर झाली असेल तरी सुध्दा उमेदवारांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा सब ऑफिसर्स आणि राष्ट्रीय अग्निशमन अकादमी, भारत सरकार यांचा पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्णकरणे बंधनकारक राहील.अशी अर्हता प्राप्त न करणा-या उमेदवाराची निवड रद्दबातल होईल.

**०६) ज्युनिअर संचार अधिकारी (वेतनश्रेणी :- रुपये ९,३००-३४,८०० व ग्रेडपे- रुपये ४,२००)**-उमेदवाराचे दिनांक ०१/०१/२०१० रोजी वय ३५ वर्षापेक्षा अधिक असू नये.

**शैक्षणिक पात्रता- अ)** बी.ई.(इलेक्ट्रॉनिक आणि टेलिकम्युनिकेशन) **किंवा** बी.ई.(इलेक्ट्रॉनिक आणि रेडिओ कम्युनिकेशन) **किंवा** बी.ई.कॉम्प्युटर (कम्युनिकेशन सह) **किंवा** बी.ई. रेडीओ इंजिनिअरींग **किंवा** बी.ई. इन्स्ट्रयूमेंटेशन **किंवा** एम.एस्सी.. इन्स्ट्रयूमेंटेशन **आणि**

अभियांत्रिकी पदवीधारक उमेदवारास पोलीस, संरक्षण दल, एअरपोर्ट ॲथॉरीटी, महानगरांच्या अग्निशमन सेवा यासारख्या मोठया संस्थांच्या रेडीओ ट्रंकिंग तात्रा व मल्टीपल चॅनेल कम्युनिकेशन प्रणाली हाताळण्याचा अनुभव आवश्यक. अद्ययावत नियंत्रण कक्ष, प्रादेशिक नियंत्रण व रिस्पॉन्स सेंटर जीपीएस(जीआयएस बेस्ड) व्हेईकल ट्रॅकींग व तत्सम सिस्टीम उभारण्यासाठी सक्षम असावी. उपरोक्त नमूद केलेल्या संस्थांमध्ये प्रत्यक्ष कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक

**१)उपरोक्त "अ" गटासाठी आवश्यक असणारी पात्रता व अनुभव पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर**

**ब)** महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाचा इलेक्ट्रॉनिक्स आणि रेडिओ अभियांत्रिकी या विषयाची प्रथम श्रेणीतील पदविकाधारक असावा. **आणि**
अभियांत्रिकी पदवीकाधारक उमेदवारास पोलीस, संरक्षण दल, एअरपोर्ट ॲथॉरीटी, महानगरांच्या अग्निशमन सेवा यासारख्या मोठया संस्थांच्या रेडीओ ट्रंकिंग तात्रा व मल्टीपल चॅनेल कम्युनिकेशन प्रणाली हाताळण्याचा अनुभव आवश्यक. अद्ययावत नियंत्रण कक्ष, प्रादेशिक नियंत्रण व रिस्पॉन्स सेंटर जीपीएस(जीआयएस बेस्ड), व्हेईकल ट्रॅकींग व तत्सम सिस्टीम उभारण्यासाठी सक्षम असावी. उपरोक्त नमूद केलेल्या संस्थांमध्ये प्रत्यक्ष कामाचा ५ ते ७ वर्षाचा अनुभव आवश्यक

**महत्वाचे** :- म.औ.वि.म.अग्निशमन सेवेतील अग्निशामक विमोचक, चालक याश्रेणीत काम करणारा कर्मचारीवर्ग अधिक असल्यामुळे या कर्मचा-यांना सुस्पष्ट मराठी व भाषेत सूचना/आदेश देणे अपेक्षित असून त्यासाठी उमेदवारास सुस्पष्ट मराठी व सुस्पष्ट इंग्रजी भाषा येणे अत्यावश्यक आहे.

**७) ऑटो इलेक्ट्रीशियन ग्रेड-२ (वेतनश्रेणीः- रुपये ५,२००-२०,२०० व ग्रेडपे- रुपये २,४००)-** उमेदवाराचे दिनांक ०१/०१/२०१० रोजी वय २८ वर्षापेक्षा अधिक नसावे.
**शैक्षणिक पात्रता** (१) एस.एस.सी. उत्तीर्ण. (२) उमेदवाराने ऑटो इलेक्ट्रीशियनचा शासनाचा लायसेन्सिग सर्टिफिकेट कोर्स किंवा समकक्ष पाठयक्रम पूर्ण करणे आचश्यक. **अनुभव** :- ऑटोमोबाईल इलेक्ट्रीशियन या पदावर काम केल्याचा २ वर्षाचा अनुभव

**८)चालक यंत्र चालक (वेतनश्रेणी :- रुपये ५,२००-२०,२०० व ग्रेडपे- रुपये २,०००)-**उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी ४५ वर्षापेक्षा अधिक असू नये.
**शैक्षणिक पात्रता** :-एस.एस.सी. उत्तीर्ण. (२) चालक (अग्निशमन) या पदावर कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचा अनुभव असावा. किंवा चालक यंत्र चालक या पदावर काम केल्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव (३) निवड झालेल्या उमेदवाराने जर राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,मुंबई यांचा चालक यंत्र चालक यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले नसेल त्यास सहा महिन्याचा **अग्निशामक पाठयक्रम** साठी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,महाराष्ट्र शासन, मुंबई येथे पुरस्कृत करण्यात येईल. ( जो पर्यंत तो सदरचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करत नाही तो पर्यत सदर उमेदवाराचा नोकरीचा कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी समजण्यात येईल.) (४)वैध जड वाहन चालविण्याचा परवाना (५) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**९) अग्निशमन विमोचक (वेतनश्रेणी :- रुपये ५,२००-२०,२०० व ग्रेडपे- रुपये १,९००)-**उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी २७ वर्षापेक्षा अधिक असू नये.
**शैक्षणिक पात्रता** :- उमेदवार १० वी (एस..एस.सी.) उत्तीर्ण असावा. (२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा अग्निशमन विमोचक प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. **अथवा** बारावी (एच.एस.सी.)पास असावा **अथवा** (२) कोणत्याही विषयाची आयटीआय ची ६० टक्के मार्क मिळवून परिक्षा पास असावा. तसेच राखीव जागेच्या उमेदवार हा ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.(३) प्रशिक्षण नसलेल्या परंतू निवड झालेल्या उमेदवारास ६ महिन्यांसाठी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, सांताक्रुझ, मुंबई येथे **अग्निशमन पाठयक्रम** परिक्षेसाठी पुरस्कृत करण्यात येईल. ( जो पर्यंत तो सदरचा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करत नाही तो पर्यत सदर उमेदवाराचा नोकरीचा कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी समजण्यात येईल.)(४) उमेदवारास मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक आहे.

**१०) मदतनीस (अग्निशमन)( वेतनश्रेणी :- रुपये ४,४४० - ७,४४० व ग्रेडपे- रुपये १,३००)-** उमेदवाराचे वय दिनांक ०१/०१/२०१० रोजी २७ वर्षापेक्षा अधिक असू नये.
शैक्षणि्क पात्रता :- उमेदवार किमान शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (२)राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा **अग्निशमन** पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (३)उमेदवारास मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक आहे.

**सर्व पदांसाठी शारीरीक क्षमता - सुदृढ शरीरयष्टीसह उमेदवाराची शारीरीक क्षमता खालीलप्रमाणे असावी.**

उंची - किमान १६५ से.मी.
छाती - ८१ सेमी (साधारण) ८६ सेमी (फुगवून)
वजन - किमान ५० किलोग्रॅम
दृष्टी - चष्म्याशिवाय (सामान्य)

**मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार,**
**मऔविम,मुंबई-४०० ०९३**

**महत्वाच्या अटी व शर्ती**

१. विहित नमुन्यातील अर्ज पोस्ट बॉक्स नं. ७७३६, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ या पत्त्यावर साध्या टपालाद्वारे (By ordinary Post ) पाठवावा. पाकीटावर पदाचे नांव आणि कोड क्रमांक ठळक अक्षरात लिहावा. अर्ज विहित नमुन्यात सुवाच्च अक्षरात असणे अनिवार्य आहे.

२. सदर भरती प्रक्रिया फक्त पुरुष उमेदवारांसाठी लागू राहील.

३. अर्जासोबत जन्मतारीखेच्या पुरावा प्रमाणपत्राच्या आणि गुणपत्रकांच्या सांक्षाकित प्रती, जातीचे प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र, सक्षम वैद्यकिय अधिका-याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व मुलाखतीचे वेळेस त्याच्या मूळ प्रती आणाव्यात.

४. **दिनांक** **२०/०८/२०१०** नंतर आलेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

५. पोस्टाने आलेले अर्ज वरील मुदतीत प्राप्त हेणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

६. अपूर्ण अर्ज तसेच अर्हतेची प्रमाणपत्रे न जोडलेले अर्ज रद्द समजण्यात येईल.

७. रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केली असल्यास, अद्यावत नोंदणी पत्र सोबत आणावे.

८. जाहिरातीत नमूद केलेल्या विविध पदांसाठी उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करता येईल. मात्र प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व अर्जासोबत स्वतंत्र धनादेश जोडणे आवश्यक आहे. प्रत्येक पदासाठी खुला वर्गातील उमेदवाराने रुपये २५०/- व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये १५०/- चा स्वतंत्र धनादेश किंवा पे-ऑर्डर **"Chief Accounts Officer, MIDC, Mumbai."**, Payable at Mumbai सोबत जोडणे आवश्यक आहे. धनादेश किंवा पे-ऑर्डर या व्यतिरिक्त कोणत्याही स्वरुपात अर्जदाराने रक्कम पाठवू नये. असे अर्ज रद्दबातल ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

९. सर्व पदांकरीता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक असून उमेदवार शालांत परिक्षा/ अथवा उच्च शालांत परिक्षेत मराठी विषय घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराने महाराष्ट्रात किमान १५ वर्ष वास्तव्याचा दाखला (डोमिसाईल सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य असेल.

१०. सर्व पदांकरीता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत **एमएससीआयटी** परिक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

११. नमूद पदांसाठी लेखी परिक्षा, शारीरीक क्षमता चाचणी आणि मुलाखत याद्वारे अंतिम निवड केली जाईल. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल तिचा अधिक तपशील परिक्षेच्या प्रवेश पत्रासोबत (Call Letter ) देण्यात येईल. चालक यंत्र चालक या पदासाठी लेखी परीक्षा असणार नाही. तथापी या पदासाठी आवश्यक असणारे जड वाहन चालविणे, तांत्रिक कौशल्य व तत्सम कामे प्रत्यक्ष येणे आवश्यक असून त्याची प्रत्यक्ष जागेवर परीक्षा घेण्यात येईल.

१२. चालक यंत्र चालक पदासाठी जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक असून अशा परवान्यावर कोणतेही प्रतिकुल शेरे/ नोंदी असू नयेत.

१३. लेखी परिक्षा उत्तीर्ण उमेदवारांची, शारीरीक क्षमता / मैदानी चाचणी/ मुलाखत ही नियोजित पध्दतीने घेण्यात येईल.

१४. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करत नसल्याचे आढळल्यास उमेदवारी रद्दबातल केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५. अंतिम निवडीपूर्वी वैद्यकिय चाचणी ही शासकिय रुग्णालय अथवा सक्षम वैद्यकिय अधिका-यांकडून मऔविम तर्फे नियोजित निकषास आधीन राहून घेण्यात येईल.

१६. लेखी परिक्षेसाठी पाठविल्या जाणा-या पत्रात परिक्षेचे स्थान, वेळ , परिक्षार्थी क्रमांक इत्यादी तपशील असेल. लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांचा तपशील महामंडळाच्या **www.midcindia.org** संकेत स्थळावर (वेबसाईटवर) पाहता येईल. ज्या पात्र उमेदवारांना परिक्षेचे प्रवेश पत्र मिळणार नाही. त्यांनी परिक्षास्थानी किमान एक तास अगोदर येवून ते प्राप्त करावे. अशा उमेदवारांनी येतांना सोबत पासपोर्ट आकाराचा स्वतःचा फोटो आणावा.

१७. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१८. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन निर्णयानुसार ०५ वर्ष शिथिलक्षम राहील.

१९. उपरोक्त नमूद सर्व पदांसाठी आवश्यक ती अर्हता व अनुभव धारण करणा-या प्रकल्पग्रस्त, गृहसंरक्षक दल, माजी सैनिक व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत पदक प्राप्त उमेदवारास शासकिय नियमाप्रमाणे नियुक्तीबाबत आरक्षण देण्यात येईल, मात्र याबाबतची आवश्यक असणा-या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२०. अग्निशमन सेवेत असलेल्या उमेदवारांनी महामंडळाकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महामंडळास देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महामंडळाकडे असतील.

२१. जे उमेदवार उपरोक्त नामनिर्देशित केलेल्या विविध पदांसाठी विहित केलेल्या शैक्षणिक अथवा तांत्रिक परिक्षेसाठी/ पाठयक्रमासाठी बसले असतील त्यांनी अर्ज करावेत. परंतू सदर अर्हता सेवा भरतीची अंतिम प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत सादर न केल्यास त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२२. विविध पदांसाठी विहित केलेली अनुभवाची अर्हता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास नमूद केलेली अनुभवाची अट शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल. व त्याबाबतचे अधिकार म.औ.वि.महामंडळाने राखून ठेवले आहेत.

(विहित नमुन्यात अर्ज करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या 'महत्वाच्या अटी व शर्ती' काळजीपूर्वक वाचाव्यात)

## अर्जाचा नमुना

(पदाचे नांव ---------------------------- पद कोड क्रमांक (इंग्रजीत) ------------------------- )

प्रति,
पोस्ट बॉक्स क्र.७७३६
बोरीवली (पश्चिम)
मुंबई -४०००९२

पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवून स्वतः साक्षांकित करावे.

| | आडनांव | नांव | मधलेनाव |
|---|---|---|---|
| १. **संपूर्ण नांव** (मराठीत) | ---------- | ---------- | ---------- |
| | SURNAME | NAME | MIDDLE NAME |

**संपूर्ण नांव** (इंग्रजीत कॅपीटल मध्ये)संगणकिय मुल्यमापनासाठी आवश्यक

२. **संपूर्ण पत्ता**(इंग्रजी कॅपीटल मध्ये पिनकोडसह)

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक :- ------------------------------------

***३. जन्मतारीख***

| | **तारीख** | **महिना** | **वर्ष** |
|---|---|---|---|
| **मराठीत** | | | |
| **इंग्रजीत** | | | |

**दि.०१. ०८.२०१० रोजीचे वय**

| **तारीख** | **वर्ष** | **महिना** |
|---|---|---|
| **मराठीत** | | |
| **इंग्रजीत** | | |

४. **जात** :

(योग्य ठिकाणी (√ ) अशी खुण करावी.

| **अजा १** | **अज २** | **विजा (अ) ३** | **भज(ब) ४** | **भज (क) ५** | **भज (ड) ६** | **विमाप्र ७** | **इमाव ८** | **खुला ९** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

५. Demand Draft Details :- (Drawn on Nationalised Bank, payable at Mumbai),in favour of "**Chief Accounts Officer, MIDC, Mumbai.**"

| Name of Bank & Branch | Date of issue | D.D.No. (6 Digits) | MICR No. (9 Digit) | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६. शैक्षणिक अर्हताः-

| उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७. तांत्रीक अर्हताः-

| उत्तीर्ण केलेली पाठयक्रम परिक्षा | प्रशिक्षण केंद्राचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. अनुभव :-

| संस्थेंचे नांव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यत | | |
| | | | | |
| | | | | |

९. अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाणी (√ ) अशी खूण करावी .)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

१०. शारीरीक क्षमता

| | |
|---|---|
| उंची | ......... से.मी. |
| छाती | ............ सेमी (साधारण)<br>......... सेमी (फुगवून) |
| वजन | ......... किलोग्रॅम |
| दृष्टी | चष्म्याशिवाय |

११. आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ? होय/नाही.

१२. अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१)
२)
३)
४)
५)

मी असे प्रमाणित -करतो /करते की, वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- सही -----------------------------------

दिनांक :- नांव ( ----------------------------------)